# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २८.०६.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक २७.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमांवर कारवाई करून ४,८४२/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये १ केसमध्ये ०६ इसमांवर कारवाई करुन ५८,०५०/– रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७१७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,४४,४१५/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) तहसील पोलीसांची कामगिरी :– घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०६.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्यीत डोबीनगर, लहान रेल्वे पटरी जवळील नाल्याचे जवळ, काळया व पांढऱ्या रंगाचा फुलशर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला इसम हातात लोखंडी फरसा घेऊन हातवारे करुन येणारे–जाणारे लोकांना शिवीगाळ करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन घटनास्थळी गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम धुमधाम शिवीगाळ करतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून त्याब्यात घेऊन निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल तौसीफ वल्द अब्दुल रफीक मेमन वय २२ वर्षे रा. ईस्माइल लिडरचे घराजवळ, तहसील, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातून स्टीलचा दांडा असलेला लोखंडी धारदार फरसा किंमती ५००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी फरसा बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्रीमती अनिता मोरे, सपोआ, कोतवाली विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. संजय मेंढे, मपोउपनि. गायत्री भरडे, पोहवा. संजय साहू, संदीप, फिरोज, पोअं. विनोद, वैभव, पवन यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे गणेशपेठ :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १९.०६.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, फिर्यादी मनोज बाबुराव सहारे वय ५० वर्षे, रा. गड्डीगोदाम, सुंदरबाग, अन्वर किराणा स्टोअर्स जवळ, सदर, नागपूर हे त्यांची पॅशन मोटारसायकल क्र. एमएच ४९ एबी ३९५६ ने पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीतील मोक्षधाम घाट रोडने जात असता, बीआर ट्रॅव्हल्स बस क्र. बीआर ६ जीजी ९३९३ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटारसायकलला धडक देवुन घटनास्थळावरून बससह पळुन गेला. अपघातात फिर्यादी हे मोटारसायकलसह खाली पडून गंभीर जखमी झाले. जखमी फिर्यादी यांना उपचाराकरीता मसंद हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते.

याप्रकरणी फिर्यादी यांनी उपचार पुर्ण करून, दिनांक २७.०६.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. व्यंकटेश नुलगोंडावार ७५०७१०८४२७ यांनी आरोपी ट्रॅव्हल्स बस वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**